MHAU060001022018

## नियमित दिवाणी दावा क्र.०७/२०१८ मधील निशाणी ५४ वरील आदेश

**( कारभारी विठ्ठल नलावडे(नरवडे) वि.राजाराम शंकर रोडे )**

प्रतिवादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आर्डर १ रुल १० प्रमाणे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने सदर दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द कायम मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यात वादी यांचा साक्षीपुरावा संपुष्टात आलेला असुन वादी क्र. १ याने दुषित हेतुने दाव्यातुन त्याचे नाव कमी करणेबाबत तसेच त्यास दावा चालविणे नसलेबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे. दावा मिळकतीतील त्याच्या मालकीचे ४८.५० आर हे संतोष सुभाष जैस्वाल यास नोंदणीकृत दस्त क्र. १२९/२०२४ अन्वये दिनांक ०५.०१.२०२४ रोजी विक्री केलेली आहे. दावा मिळकतीतील क्षेत्राबाबत कमी अधिक क्षेत्राचा मुळ वाद असताना वादी याने सदरची वाद मिळकत संतोष जैस्वाल यास विक्री केलेली आहे. त्यामुळे संतोष जैस्वाल यास सदर दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्याची परवानगी मागीतली आहे.

३. सदर अर्जावर वादी क्र. २ ते ४ यांनी निशाणी ५८ कडे वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द केवळ कायमचा मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात वादींचा अशंतः पुरावा झालेला आहे. दावा प्रलंबित असताना वादी क्र. २ ते ४ यांची कोणतीही संमती न घेता व माहीती न देता त्रयस्त ईसम संतोष सुभाष जैस्वाल यास दावा मिळकतीमधील ० हेक्टर ४८.५० आर जमीनीचे क्षेत्र कागदोपत्री हस्तांतरीत केलेले आहे. तसेच त्यास सदरचे प्रकरण चालविण्याचे नसल्याबाबतचा लेची अर्ज सदर प्रकरणात दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना वादी क्र. १ याने वाद मिळकतीपैकी ४८.५० आर क्षेत्र संतोष जैस्वाल यास विक्री केलेली आहे. त्यामुळे त्रयस्त ईसमाने सदर दाव्यात समाविष्ट होउन वादी व प्रतिवादी

यांच्या वादमध्ये अगर न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांनी वाद मिळकतीच्या दक्षिण बांधालगतची वादीची जमीन कोरु नये व वादीच्या जमीनीत, कब्जास, उपभोगास, वहिवाटीस मेहनत मशागतीस हरकत अडथळा करु नये असा कायम मनाई हुकुम मागीतलेला आहे. सदर प्रकरणात निशाणी ४९ कडे वादी क्र.१ याने सदरचे प्रकरण पुढे चालविणे नसल्याबाबतचा लेखी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु सदर तारखेस वादी स्वतःहा हजर नसल्याकारणाने सदर अर्जाबाबत साशंकता व संदिगता निर्माण झाल्याने सदरचा अर्ज पाहुन दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वाद मिळकतीपैकी ४८.५० आर हे क्षेत्र संतोष जैस्वाल यास विक्री करण्यात आलेली आहे. सदर दावा हा निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर दावा शाबीत करणे वादीची जबाबदारी आहे. त्यामुळे वादीस संतोष जैस्वाल यास आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्याचे आदेश देणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादीचा निशाणी ५४ चा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. दंडाविषयी आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात घोषित)

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2024.05.15 10:43:59 +0530

(श्रीमती अ. ई. आवटी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
(न्यायालय क्र.२) कन्नड.

ठिकाणः कन्नड.
दिनांकः १०.०५.२०२४

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. आदेश या मधील सर्व मजकुर मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :– | **श्रीमती अ. ई. आवटी,**<br>सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| लघुलेखकाचे नांव | :– | आर. एस. टाकळकर |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :– | १०.०५.२०२४ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :– | १०.०५.२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :– | १०.०५.२०२४ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :– | १०.०५.२०२४ |

---------------------------